राज्यातील नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकासाला चालना देण्याच्यादृष्टीने द्यावयाच्या सवलतीबाबत....

**महाराष्ट्र शासन**

**गृहनिर्माण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण २०१९/प्र.क्र.१०/दुवपु-१**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : १३ सप्टेंबर, २०१९

वाचाः - शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग क्रमांक : संकिर्ण २०१९/प्र.क्र.१०/दुवपु-१ दि. ०८ मार्च, २०१९

**प्रस्तावना :-**

राज्यातील जुन्या व जीर्ण झालेल्या इमारतींचा पुनर्विकास करण्याकरीता सध्या प्रचलित असलेल्या कार्यपध्दतीनुसार संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून विकासकाची नियुक्ती करण्यात येते. संबंधित नियोजन प्राधिकरण/महानगरपालिका/स्थानिक स्वराज्य संस्थेकडून तयार करण्यात आलेल्या विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींनुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांचा पुनर्विकास करण्यात येतो. विकास नियंत्रण नियमावलीमध्ये उपलब्ध होणाऱ्या वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकाचा लाभ प्रामुख्याने विकासकास होत असल्याने संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभासदांना विशेष लाभ मिळत नाही. त्याचप्रमाणे पुनर्विकास प्रक्रियेमध्ये गृहनिर्माण संस्थांच्या सभासदांचा सहभाग अत्यल्प असल्याने संपूर्ण प्रकल्प विकासकाच्या मर्जीवर राबविला जातो व परिणामत: अनेक प्रकल्प अपूर्ण अवस्थेत पडून असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचप्रमाणे सदर प्रकल्पातील विक्री सदनिकाकरीता कर्ज काढून गुंतवणूक केलेल्या खरेदीदारांना घराचा ताबा विहित कालावधीत न मिळाल्यामुळे त्यांना आर्थिक अडचणी सहन कराव्या लागतात. या परिस्थितीत संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या सभासदांनी एकत्रित येऊन स्वयंपुनर्विकास केल्यास, पुनर्विकास प्रकल्पावर संपूर्णपणे संबंधित सहकारी संस्थेचे नियंत्रण राहील. तसेच, वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकाचा लाभ देखील सदर सहकारी संस्थेच्या सभासदांना मिळू शकेल. त्याअनुषंगाने राज्यातील शासकीय / निमशासकीय / खाजगी जमिनीवरील सर्व नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या इमारतींचा स्वयंपुनर्विकास करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीकोनातून सवलती देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या दि.०८/०३/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला.

सदर बैठकीत घेतलेल्या निर्णयांच्या अनुषंगाने नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या इमारतींचा स्वयंपुनर्विकास करण्यासाठी प्रोत्साहन देण्याकरिता त्यांना द्यावयाच्या सवलतींचे प्रमाण व स्वरूप कसे असावे, याबाबत शासनास शिफारशी करण्याकरिता विभागाच्या दि. ०८/०३/२०१९ रोजीच्या शासन निर्णायान्वये अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय समितीची स्थापना करण्यात आली. सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून समितीचा अहवाल शासनाने स्विकृत केलेला आहे. या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने राज्यातील शासकीय / निमशासकीय / खाजगी जमिनीवरील सर्व नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या इमारतींचा स्वयंपुनर्विकास करण्यासाठी सवलती देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

राज्यातील शासकीय / निमशासकीय / खाजगी जमिनीवरील सर्व नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या इमारतींचा स्वयंपुनर्विकास करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीकोनातून याबाबत स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीने खालीलप्रमाणे शिफारशी केलेल्या आहेत-

१) **<u>स्वयंपुनर्विकास करण्यासाठी पात्रता</u>** :- राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थेतील ज्या इमारती ३० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक जुन्या असतील त्या इमारती स्वयंपुनर्विकासासाठी पात्र असतील.

२) **<u>एक खिडकी योजना :-</u>** राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांचा स्वयंपुनर्विकासाच्या योजनेसाठी शासकीय/ निमशासकीय विभागाकडून विविध परवानग्यांची आवश्यकता असते. या सर्व परवानग्या मिळण्यासाठी विविध विभागांकडे स्वतंत्रपणे पाठपूरावा करावा लागतो, त्यामुळे सदर प्रक्रियेस अधिक कालावधी लागतो. जर सदर परवानग्या विहित कालावधीत व एकाच कार्यालयात प्राप्त झाल्यास पुनर्विकासाची प्रक्रिया जलद होऊन संबंधित योजना लवकर पूर्ण होते. त्यामुळे राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांचा स्वयंपुनर्विकासातील विविध परवानग्या एकाच ठिकाणी मिळण्यासाठी एक खिडकी योजना सुरु करावी.

३) **<u>योजनेस मंजुरी देण्यासाठीची कालमर्यादा</u>** :- एक खिडकी योजनेच्या माध्यमातून सहकारी गृहनिर्माण संस्थांचा स्वयंपुनर्विकासाच्या योजनेतील सर्व परवानग्या या प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत पूर्ण करणे बंधनकारक करण्यात यावे.

४) **<u>चटईक्षेत्र निर्देशांक/प्रोत्साहन क्षेत्रफळ:-</u>** राज्यातील ३० वर्षापेक्षा जुन्या असलेल्या ज्या सहकारी गृहनिर्माण संस्था स्वयंपुनर्विकासाचा मार्ग स्विकारतील अशा संस्थांना, संबंधित स्थानिक विकास नियंत्रण नियमावलीनुसार पुनर्विकासासाठी देय असलेले चटईक्षेत्र निर्देशांक/प्रोत्साहन क्षेत्रफळापेक्षा १० % अधिकचे चटईक्षेत्र अनुज्ञेय करण्यात यावे. तसेच ज्या इमारतीती ल रहिवाशांसाठीचे पुनर्वसन क्षेत्रफळ (Rehab Area) हे अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांकापेक्षा अधिक असेल अशा परिस्थितीत पुनर्वसन क्षेत्रफळापेक्षा (Rehab Area) १० % अधिकचे चटईक्षेत्र अनुज्ञेय करण्यात यावे. तसेच, ९.०० मी पेक्षा कमी रूंदी असलेल्या रस्त्यावरील इमारतीबाबत सध्या देय असलेला ०.२ FSI (अधिमुल्यासह) एवजी विनामुल्य ०.४ FSI देण्यात यावा.

५) **<u>पुनर्विकासासाठी आवश्यक असणा-या रस्त्यांबाबत</u>**- ज्या सहकारी संस्था सामुहिक स्वयंपुनर्विकास करू इच्छितात, त्यांना दोन रस्ते आवश्यक असण्याची अट शिथिल करून दाट लोकवस्तीतील ९.०० मी रूंदीच्या रस्त्यावरील व विरळ लोकवस्तीतील १२.०० मी. रूंदीच्या रस्त्यावरील इमारतींच्या पुनर्विकासास परवानगी

देण्यात यावी. तसेच, रस्ता ९.०० मी रूंदीचा होण्यासाठी आवश्यक असलेली जमीन, संबंधित सहकारी संस्थेने उपलब्ध करून द्यावी व इमारतीच्या Front Margin मध्ये त्याप्रमाणात सवलत देण्यात यावी.

६) **हस्तांतरणीय विकास हक्क (TDR)** :- राज्यातील ज्या सहकारी गृहनिर्माण संस्था स्वयंपुनर्विकासाचा मार्ग स्विकारतील अशा संस्थांना TDR विकत घ्यावयाचे झाल्यास, संबंधित नियोजन प्राधिकाऱ्याकडून संस्थेने शिघ्रगणकाच्या दराच्या ५०% सवलतीच्या दराने हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) उपलब्ध करुन घ्यावेत.

७) **प्रिमिअम दरामध्ये सवलत** -: पुनर्विकास करताना संबंधित नियोजन प्राधिकरणामार्फत विविध प्रकारचे प्रिमिअम आकारले जातात. सदर प्रिमिअमच्या दरामुळे एकूण खर्चात वाढ होते. त्यामुळे राज्यातील नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकासास प्रोत्साहन देण्यासाठी सदर प्रिमिअमच्या दरात सवलत देणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने नियोजन प्राधिकरणामार्फत आकारल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या प्रिमिअम दरात सवलत देण्यात यावी.

८) **प्रिमिअमचा भरणा करण्यासाठी टप्पे ठरविणेबाबत** :- पुनर्विकास प्रक्रियेत संबंधित नियोजन प्राधिकाऱ्यामार्फत आराखडे मंजूर करताना विविध प्रिमिअम्सचा भरणा करणे अनिवार्य असते. सदर प्रिमिअम्सची रक्कम एकरकमी भरल्यास त्याचा ताण हा प्रकल्प खर्चावर मोठया प्रमाणात एकदमच पडतो. त्यामुळे संबंधित गृहनिर्माण संस्थेकडे निधीची चणचण भासू शकते. त्यामुळे यावर उपाय म्हणून स्वयंपुनर्विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध प्रकारचे कर/प्रिमिअम एकरकमी संबंधितांकडून भरुन न घेता, ती रक्कम भरण्यासाठी संबंधित नियोजन प्राधिकाऱ्याने टप्पे विनिर्दिष्टीत करावेत.

९) **स्वयंपुनर्विकासाचा मार्ग स्विकारणाऱ्या नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांना विविध कर/शुल्क सवलतींबाबत :-**

अ) Land Under Construction Assessment Tax (LUC Tax) :-स्वयंपुनर्विकास करणाऱ्या नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांनी जर विहित कालावधीत स्वयंपुनर्विकास पूर्ण केला तर अशा संस्थाना LUC Tax मधून सूट देण्यात यावी. तथापि, ज्या संस्था विहित कालावधीत स्वयंपुनर्विकास करणार नाहीत अशा संस्थांकडून सध्याच्या प्रचलित दराने LUC Tax वसूल करण्यात यावा.

आ) **मुद्रांक शुल्क :-** स्वयंपुनर्विकास प्रकल्पात अस्तित्वातील सहकारी गृहनिर्माण संस्थेव्यतिरिक्त कोणीही तिसरा लाभार्थी नसल्याने कुठलाही करारनामा करण्याची गरज नसते. त्यामुळे अस्तित्वातील गाळेधारकांना प्रस्तावित घरे ही स्वयंपुनर्विकासामार्फत उपलब्ध झाल्याने अशा नवीन गाळयांसाठीच्या करारानाम्यावर पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पातील लाभार्थ्यांकडून ज्याप्रमाणे रुपये १०००/- एवढे मुद्रांक शुल्क आकारले जाते त्याप्रमाणे स्वयंपुनर्विकास करणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सभासदांकडून मुद्रांक शुल्क आकारण्यात यावे. तथापि, स्वयंपुनर्विकासनंतर तयार

होणाऱ्या नवीन इमारतीमधील मूळ सभासदासाठीच्या सदनिकाव्यतिरिक्त खुल्या बाजारात विक्रीस उपलब्ध होणाऱ्या गाळयासाठीच्या करारनाम्यावर प्रचलित दराने मुद्रांक शुल्क लागू करण्यात यावा.

इ) **वस्तु व सेवाकर (जीएसटी) :-** स्वयंपुनर्विकास करणाऱ्या नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांना द्याव्या लागणाऱ्या वस्तु व सेवा करामध्ये सवलत देण्यात यावी.

ई) **ओपन स्पेस डेफिशेयन्सी डेव्हलपमेंट चार्जेस :-** स्वयंपुनर्विकासाचा मार्ग स्विकारणाऱ्या नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांना ओपन स्पेस डेफिशेयन्सी डेव्हलपमेंट चार्जेस सवलत देण्यात यावी.

१०) **नोडल एजन्सी** :- राज्यातील स्वयंपुनर्विकासाचा मार्ग स्विकारणाऱ्या नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांना वित्तीय पुरवठा करणे, मार्गदर्शन करणे तसेच सदर योजना राबविण्यासाठी वेळोवेळी प्रोत्साहन देणे इत्यादीसाठी नोडल एजन्सी असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीकोनातून राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकासासाठी सहकार क्षेत्रातील शिखर बँक असलेली राज्य सहकारी बँक ही नोडल एजन्सी म्हणून त्या-त्या जिल्ह्याच्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून काम पाहील. सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकासास चालना देण्यासाठी सदर नोडल एजन्सीने स्वयंपुनर्विकासाबाबतची संपूर्ण कार्यपध्दती, प्रक्रिया, इत्यादी बाबतची विस्तृत माहिती विविध प्रसिध्दी माध्यमांव्दारे प्रसिध्द करावी.

११) **स्वयंपुनर्विकास योजना पूर्ण करण्याचा कालावधी** :- राज्यातील ज्या नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था स्वयंपुनर्विकासाचा मार्ग स्विकारतील त्या संस्थांनी संबंधित प्राधिकरणाकडून योजना मंजूर झाल्यानंतर ३ वर्षाच्या आत संपूर्ण पुनर्विकास करणे बंधनकारक असेल.

१२) **कर्जाच्या व्याजदरात सवलत:-** स्वयंपुनर्विकासाचा मार्ग स्विकारणाऱ्या गृहनिर्माण संस्थांना बँकेच्या कर्जाचा व्याजदरात सबसिडी देण्यात यावी. त्यानुसार शासनाकडून व्याजदरात ४% सबसिडी देण्यात यावी.

१३) **स्वयंपुनर्विकासासाठी प्राधिकरण** :- राज्यात सध्या गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासासाठी मंजूरी देणारे प्राधिकरण हेच सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकासासाठी नियोजन प्राधिकारी म्हणून कार्यरत राहतील.

१४) **त्रिपक्षीय करार :-** स्वयंपुनर्विकास करणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना वित्तीय पुरवठा करणारी संस्था, संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्था व त्यासंस्थेद्वारे नेमण्यात आलेला कंत्राटदार या तीन पक्षांमध्ये स्वयंपुनर्विकासाबाबत आवश्यक अटी व शर्तीसह त्रिपक्षीय करार (Tri-partite Agreement) करणे बंधनकारक असेल.

१५) **<u>प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत संस्थेंचा स्वयंपुनर्विकास</u>** :- प्रधानमंत्री आवास योजनेतील मार्गदर्शक सुचनांस अनुसरुन संबंधित नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था विक्री घटकातील ३५% सदनिका आर्थिकदृष्टया दुर्बल घटक/अल्प उत्पन्न गटातील (EWS/LIG) लाभार्थ्यांसाठी बांधण्यास तयार असतील तर सदर नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेस पंतप्रधान आवास योजनेप्रमाणे २.५ चटई क्षेत्र निर्देशांक, पात्र लाभार्थ्यास रुपये २,५०,०००/- अनुदान तसेच इतर अनुषंगिक लाभ देण्यात यावेत.

१६) **<u>दक्षता समिती</u> :-** सहकारी गृहनिर्माण संस्थांचा स्वयंपुनर्विकास हा विहित कालावधीत पूर्ण होणे आवश्यक आहे. तसेच नवीन इमारतीचे बांधकाम हे चांगल्या दर्जाचे असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीकोनातून स्वयंपुनर्विकासाच्या कामावर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी संबंधित संस्थेतील किमान दोन प्रतिनिधी, स्वयंपुनर्विकासास अर्थसहाय्य करणाऱ्या वित्तीय संस्थेतील किमान एक प्रतिनिधी यांची दक्षता समिती संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेने गठीत करावी.सदर समितीस नवीन इमारतींच्या कामाचे प्रत्येक तीन महिन्यांनी स्थळपाहणी करुन त्याबाबतचा प्रगती अहवाल संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेस तसेच संबंधित नियोजन प्राधिकरणाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

१७) **<u>तक्रार निवारण समिती (Grieviance Redressal Committee)</u> :-** राज्यातील नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांना स्वयंपुनर्विकास करताना विविध प्रकारच्या अडचणी/तक्रारी/आक्षेप उद्भवण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यानुषंगाने सदर अडचणी सोडविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या स्तरावर एक तक्रार निवारण समिती असेल. सदर समितीमध्ये खालील अधिकारी/पदाधिकारी यांचा समावेश राहील :-

१) संबंधित जिल्ह्यातील जिल्हा उपनिबंधक अथवा त्यांनी नामनिर्देशित केलेला प्रतिनिधी.

२) संबंधित जिल्ह्यातील नियोजन प्राधिकरणाकडून प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी.

जिल्ह्यातील ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकासाबाबत समितीकडे तक्रारी प्राप्त होतील, त्या तक्रारींचे निवारण करताना सुनावणीसाठी स्वयंपुनर्विकासाच्या कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या दक्षता समितीतील सदस्य तसेच संबंधित नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेतील किमान दोन प्रतिनिधीस बोलाविणे बंधनकारक राहील.

१८) **<u>कंत्राटदाराची निकष व नोंदणी</u>** :- सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या स्वयंपुनर्विकासासाठी नियुक्त करावयाच्या कंत्राटदारांचे निकष संबंधित नियोजन प्राधिकरणाने स्थानिक परिस्थिती/आवश्यकतेनुसार निश्चित करावेत. तसेच अशा कंत्राटदारानी संबंधित नियोजन प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक राहील.

१९) **<u>स्वयंपुनर्विकासाठी कंत्राटदाराची नियुक्ती</u>** :- सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या स्वयंपुनर्विकासासाठी संबंधित संस्था कंत्राटदाराची नियुक्ती करते. त्यामुळे योग्य व सक्षम कंत्राटदाराची नियुक्ती होणे आवश्यक आहे. त्यासाठी

संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेने तांत्रिक/आर्थिकदृष्टया सक्षम असलेल्या कंत्राटदाराचे मागील तीन वर्षाचे आर्थिक ताळेबंद पाहून सक्षम कंत्राटदाराची नियुक्ती करावी.

२०) **स्वयंपुनर्विकासाठी नेमण्यात आलेल्या कंत्राटदाराविरुध्द कारवाई** :- स्वयंपुनर्विकासासाठी कंत्राटदाराकडून नवीन इमारतीच्या बांधकामाचा आराखडा/इमारतीच्या बांधकामाचे टप्पे व त्यासाठी लागणाऱ्या कालावधीबाबत सहकारी गृहनिर्माण संस्थेस बांधकामाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर बांधकामाची प्रगती तसेच बांधकामाच्या गुणवत्तेवर दक्षता समिती नियंत्रण ठेवेल. त्यानुसार दक्षता समितीने सहकारी गृहनिर्माण संस्थेस सादर केलेल्या अहवालानुसार जर कामाची प्रगती समाधानकारक नसेल व प्रकल्प पूर्ण होण्यास उशीर होत असल्यास संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्था दोषी कंत्राटदारास काढून टाकून नविन कंत्राटदाराची नेमणूक करु शकेल. तसेच अशा दोषी कंत्राटदाराचे नांव संबंधित नियोजन प्राधिकाऱ्याने काळ्या यादीत टाकावे व अशा दोषी कंत्राटदाराला नवीन प्रकल्प मंजूर करु नये.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१३१८०२०९९४०९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरी करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(रा. कों. धनावडे)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव,
४. मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव,
५. मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य,
७. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
९. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१२. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

१३. प्रधान सचिव (सहकार), सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. मंत्रालयीन सर्व विभाग,
१६. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, वांद्रे, मुंबई,
१७. सर्व विभागीय आयुक्त,
१८. व्यवस्थापकीय संचालक, सिडको,
१९. व्यवस्थापकीय संचालक, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
२०. सर्व आयुक्त, महानगरपालिका,
२१. सर्व जिल्हाधिकारी,
२२. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
२३. संचालक, राज्य सहकारी बँक,
२४. सर्व जिल्हा उपनिबंधक,
२५. सर्व मुख्य अधिकारी, नगर पालिका/नगर परिषद,
२६. सर्व उप सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई,
२७. सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई,
२८. कार्यासन-दुवपु-१, संग्रहार्थ.